# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०४/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**पो.स्टे. मौदा**:— अंतर्गत १८ कि. मी. अंतरावरील पलसांड शिवार येथे दिनांक २५/०४/२२ चे १८.३० वा. ते २६/०४/२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— गुलाब प्रेमजीभाई पटेल वय ५८ वर्ष, रा.नागपूर हे पलसाड शिवारात प्लॉट न. ३८०/१ येथे गोंदचा कारखाना तयार करीत असून त्यासाठी दि २३/०४/२२ रोजी १५४ किलो वजनाचे ॲगल व ११७१ किलो वजनाचे लोखंडी चॅनेल आणून ठेवले होते. शेड बांधण्याचे काम सुरु असून रोंज पाहनी करीता फिर्यादी जात असतात दि. २६/०४/२२ रोजी सकाळी १०.३० वा दरम्यान पाहनी करण्याकरीता गेले असता प्लॉटवर ठेवलेल ६ फुॅट लांब ३ इंच रुदीचे सी.आकाराचे चॅनेल २१ नग कि १२,२००/—रु. व ४ फुट लांबीचे दीड इच ९ नग १,२००/—रु. असा एकुण कि. १३,४००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मोहोड मो.क्र. ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. अरोली**:— अंतर्गत ०१ कि.मी अंतरावररल अरोली येथे दिनांक २५/०४/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान अर्जुन किसन रंगारी वय ४७ वर्ष, रा. अरोली हा आपले झोपडी जवळील गाईचे दुध काढीत असताना अरोपी क्र १ १. शरद मारोती राउत हा फिर्यादीजवळ आपले मोबाईलवर बोलत असतांनी फिर्यादीयांनी त्याला म्हटले की, 'दुसरीकडे जावुन फोनवर बालनी कर' या कारणावरुन आरोपीने 'तुझे बापाची जागा आहे काय'? असे म्हणुन हातबुक्कीने मारहाण केली. यानंतर अरोपी २. विनोद मारोती राउत, ३. प्रमोद मारोती राउत ४. आकाश बंडु राउत ५. महेश जगन राउत ६. अनिल वसंता राउत सर्व रा. अरोली यांना आरोपी क्र. १. ने फोन करुन बोलावले आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ करुन हातबुक्कीने मारहाण करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३,३२३,५०४,५०६ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार टिकाराम जाधव हे करीत आहे.

# पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. कळमेश्वर** – दिनांक २८/०४/२०२२ चे १३.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीयांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी हि मोबाईल फोनवर बोलण्याचा कारणावरून तिचे आई सोबत भांडण करून घरून निघून गेली. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. फिर्यादी यांचे मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री बुंदे मो.क्र. ८९९९६९४०१३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** – दिनांक २८/०४/२०२२ चे २०.३० वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला हि दर्ग्यावर जेवणाला गेली असता ती रात्री ०८.३० वा. सुमारास परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. फिर्यादी यांचे मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कामडी मो.क्र. ९९२३१३३९७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**